# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
# राष्ट्रीय आरोग्य अभियान, बीड
## करारतत्वावर कंत्राटी पदे नेमणूकीकरिता जाहिरात

खालील पदाकरीता इच्छुक उमेदवारांनी दर्शविलेल्या ठिकाणी आपले अर्ज **जाहीरात प्रसिध्दी दिनांक ०६/०२/२०२४ पासुन दिनांक २६/०२/२०२४** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन आवक जावक विभाग,जिल्हा रुग्णालय,बीड येथे खालील नमुन्यामध्ये व्यक्तीशः सादर करावेत पोस्टाने पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | शैक्षणिक अर्हता | अनुभव (एनएचएम किंवा शासकिय) | प्रवर्ग निहाय रिक्त पदे | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | District Programme Manager (Ayush) | 1 | जि.रु.बीड | Graduation degree in any discipline including AYUSH & MBA In Healthcare Management/Masters in Health administration/Post Graduation diploma in Hospital & healthcare Management | 3 Years | खुला-१ | 35000/- |
| 2 | Medical Officer RBSK (Female) | 1 | ग्रा.रु माजलगांव | AYUSH UG | | खुला-१ | 28000/- |
| 3 | Audiologist (DEIC) | 1 | जि.रु.बीड | Degree in Audiology | | खुला-१ | 25000/- |
| 4 | Facility Manager (HMIS) | 2 | जि.प.बीड व जि.रु. बीड | MCA/B.Tech | 1 years | वि.जा (अ)-१<br>खुला-१ | 25000/- |
| 5 | Optometrist | 1 | जि.रु.बीड | B.sc In Optometry | 2 years | इ.मा.व - १ | 20000/- |
| 6 | Physiotherapist (DEIC & NPCDCS) | 2 | जि.रु.बीड | Graduate Degree in Physicotherapy | 2 years exp. | इ.मा.व - १<br>खुला - १ | 20000/- |
| 7 | Staff Nurse | 23 | प्रा.आ.केंद्र/ग्रा.रु./उजिरु/जि.रु. | RGNM | | अनु.जाती - १<br>अनु.जमाती -१<br>भ.ज (क) - २<br>वि.मा.प्र -१<br>इ.मा.व -१०<br>इडब्ल्यूएस -१<br>खुला - ७ | 20000/- |
| 8 | Pharmacist | 3 | ग्रा.रु./उजिरु /जि.रु. | 12th + Diploma in pharmacy | | अनु.जाती-१<br>अनु.जमाती-१<br>भ.ज (क) -१ | 17000/- |
| 9 | Entomologists | 5 | १५ वित्त आयोग अंतर्गत तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय धारुर, गेवराई, पाटोदा, परळी व केज | M.sc. Zoology | 5 years exp. | अनु.जाती-१<br>अनु.जमाती-१<br>वि.जा (अ) -१<br>इ.मा.व - १<br>खुला -१ | 40000/- |
| 10 | Public Health specialist | 5 | | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | | अनु.जाती-१<br>अनु.जमाती-१<br>वि.जा (अ) - १<br>इ.मा.व - १<br>खुला -१ | 35000/- |
| 11 | Lab Technician | 10 | १५ वित्त आयोग अंतर्गत तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय धारुर, गेवराई, पाटोदा, परळी व केज | 12th + DMLT. Diploma | | अनु.जाती-१<br>अनु.जमाती-१<br>वि.जा (अ) - १<br>भ.ज (क) - १<br>भ.ज (ड) -१<br>इ.मा.व - २<br>इडब्ल्यूएस - १<br>खुला -२ | 17000/- |

अटी व शर्ती :-

**१. या पुढे रिक्त होणाऱ्या वैद्यकिय अधिकारी (MBBS) च्या बाबतीत नव्याने जाहीरात देण्यात येणार नसून प्रत्येक सोमवारी रीक्त पदांसाठी (फक्त MBBS वै.अ.) सकाळी ११ वाजता Walk In interview व्दारे रीक्त पदे भरण्यात येतील त्यामुळे उमेदवरांनी आपला अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय येथे सादर करावा.**

२. जाहीरातीतील पदे ही राज्य शासनाची नियमीतची पदे नसुन सदरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत सदर पदांवर कायमपणाचा हक्क राहणार नाही.

३. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही २९ जुन २०२४ पर्यंत राहील व त्यानंतर राज्यस्तरावरुन प्राप्त सुचनानंतर पुनर्नियुक्ती देण्यात येईल.

४. अर्ज स्वीकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवारांचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे व कमाल वयोमर्यादा (खुल्या प्रवर्गासाठी ३८ व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्षे ) या पेक्षा जास्त नसावे.

५. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखला झालेला नसावा.

६. स्टाफ नर्स या पदाकरीता ९० टक्के महिला व १० टक्के पुरुष या प्रमाणे निवड करण्यात येईल. (मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे पत्र दि.२२/११/२०२१)

७. वरील तक्त्यातील पद क्र.१,२,६,७,९,११ व १२ या पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संबधित कौन्सींलकडे नोंदणी व पुर्ननोंदणी केलेली प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. संबधित कौन्सींलकडे नोंदणी व पुर्ननोंदणी केलेली प्रमाणपत्र नसल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

८. जाहिराती मधील रिक्त पदांच्या संख्येत व सामाजिक आरक्षणामध्ये बदल होवू शकतो तसेच रिक्त पदांच्या ठिकाणामध्ये बदल होवू शकतो.पदभरती स्थगीत करणे/रदद करणे व पदभरती प्रक्रिया या बाबचे सर्व अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,बीड यांनी राखुन ठेवलेले आहे. या बाबत कोणलाही कसल्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

९.अर्जदारास एकपेक्षा जास्त पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वंतत्र्य अर्ज सादर करावेत .

१०. सविस्तर जाहिरात,पात्र अपात्र उमेदवांराची यादी,निवड/प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबची सर्व माहिती/सुचना राष्ट्रीय आरोग्य अभियान,बीड च्या नोटीस बोर्डवर व बीड जिल्हयाच्या संकेस्थळावर www.beed.gov.in येथे वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल या बाबत आर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.

११. निवड झालेल्या उमेदवारांना निवड यादीतील गुणानुक्रमांच्या आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल या बाबत उमेदवारांनी कुठल्याही दबाव तत्रांचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रदद करण्यात येईल.

१२. शासकिय,राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार पदभरती/निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१३. पदासाठीचे वेतन हे एकत्रित प्रतीमहा मानधन आहे.

१४. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी गठीत करण्यात आलेल्या निवड समितीमार्फत निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

१५.जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या पदांसाठी निवड प्रक्रिया पुर्ण करुन प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल व सदर यादी पुढील वर्षेभरात राष्ट्रीय आरोग्य अभियानात वेळोवेळी रिक्त होणाऱ्या पदांच्या भरतीकरीता वापरण्यात येईल.

१७. निवड प्रक्रिये दरम्यान उमेदवारास जिल्हास्तरावर उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१८. उपरोक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरिता असलेली पात्रता (अनुभव व अर्हता) आवश्यकते नुसार शिथील करण्यात येईल.तसेच राखीव प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना तात्पुरती नेमणूक देण्यात येईल. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील उमेदवार राखीव प्रवर्गासाठी अर्ज दाखल करु शकतील परंतू राखीव प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे अर्ज गृहीत धरले जाणार नाहीत. व अर्जाचे शुल्क परत केले जाणार नाही.

१९. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोई नुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

२०. अर्जासोबत राखीव प्रवर्गाच्या जागेसाठी रु.१००/-व खुला प्रवर्गासाठी रु.१५०/ चा **"DISTRICT INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY, BEED"** या नावे देय असलेला राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष (डी.डी.) जोडावा.

२१. सदर पदभरती बाबतची न्याय प्रक्रिया ही जिल्हा सत्र न्यायालय बीड यांच्या न्याय कक्षेत मर्यादित असेल.

२२. आर्जासोबत उमेदवांरानी लहान कुटुंबाचे प्रतीज्ञापत्र जाहीराती सोबत जोडण्यात आलेल्या विहीत नमुन्यात जोडणे अनिर्वाय आहे.

**२३. उमेदवारांनी अर्ज करतांना जाहिरातीतील अनुक्रमांक व पदाचे नाव यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसेच जाहिराती सोबत जोडलेल्या नमुन्यातच परीपुर्ण भरलेले अर्ज स्वीकारले जातील .अपुर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

- **आवश्यक कागदपत्रे**

राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष (डी.डी.),जन्मतारखेचा दाखला, शैक्षणिक अर्हता संबधी आवश्यक कागदपत्रे गुण पत्रक, जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र, आभा कार्ड, अनुभव प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचे दोन फोटो इ. झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहिल. अपुर्ण कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

**- स्वाक्षरीत -**
**सदस्य सचिव**
**निवड समिती तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद,बीड**

**- स्वाक्षरीत -**
**अध्यक्ष**
**निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,बीड**